03-07-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 7/2/2025 10:17 PM Page 1



# उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल: आर पी २०२१ ला सर्वोच्च प्राधान्य

## गोवा फाउंडेशनसह कार्यकर्त्यांना मोठा दिलासा | सरकारच्या भूमिकेवर गंभीर ताशेरे

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. २ :** उत्तर गोव्यातील कळंगुट, कांदोळी , पर्रा,हडपीड आणि नागोवा या पाच गावांसाठी तयार करण्यात आलेल्या आराखडा विकास योजनांवर ( ओडीपी) अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने पूर्णविराम दिला आहे. ११८ पानी ऐतिहासिक निकालाद्वारे या सर्व गावांचे ओडीपी रद्द करण्यात आले असून, त्याऐवजी प्रादेशिक योजना २०२१ चे कठोर पालन अनिवार्य ठरवण्यात आले आहे.

या निर्णयामुळे या गावांमध्ये आरपी २०२१ ला विसंगत असलेल्या सर्व झोनिंग प्रमाणपत्रे, बांधकाम परवानग्या आणि विकास कामे बेकायदेशीर ठरवण्यात आली असून, त्यांच्यावर तोडफोडीची कारवाई होऊ शकते.

गोवा फाउंडेशन, रोशन मथियस, कळंगुट मतदारसंघ मंच आणि कळंगुट पंचायत यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकांवर सुनावणी करत न्यायालयाने टीसीपी कायदा १९७४ चे उल्लंघन केल्याच्या मुद्द्याला दुजोरा दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, संबंधित ओडीपीची तयारीच कायदेशीर प्रक्रियेचा अवमान करणारी आहे.

न्यायालयाने म्हटले की, प्रादेशिक योजना म्हणजे राज्याची अधिकृत आणि अंतिम नियोजन चौकट आहे. कोणतेही कार्यकारी आदेश, परिपत्रके किंवा ओडीपी योजनेच्या माध्यमातून ती डावलणे किंवा बदलणे कायद्याला धरत नाही. त्यामुळे, आरपी २०२१ च्या मर्यादा, पर्यावरणीय क्षेत्र निश्चिती आणि विकासाचे निकष हेच बंधनकारक असतील.

न्यायालयाने २२ डिसेंबर २०२२ रोजी नगररचनाकाराने जारी केलेले परिपत्रकही रद्द केले. या परिपत्रकाद्वारे संबंधित गावांना डी–अधिसूचित करण्यात आले होते, परंतु तरीही निष्क्रिय ओडीपी कार्यरत ठेवण्यात आले होते. राज्य सरकारने यावर स्थगिती मिळाल्यानंतर अध्यादेश काढून ती मागे घेण्याचा प्रयत्न केला, परंतु तो कालबाह्य झाला. त्याचप्रमाणे, संविधानाच्या कलम १६२ अंतर्गत जारी केलेला कार्यकारी आदेशही रद्द करण्यात आला.

गोवा फाउंडेशनचे संचालक क्लॉड अल्वारेस यांनी या निकालाचे स्वागत करत म्हटले, प्रादेशिक योजना व पर्यावरणीय क्षेत्रे पवित्र आहेत, हे न्यायालयाने ठामपणे स्पष्ट केले. योजनेला न मानणारी कोणतीही विकास कामे बेकायदेशीर असून, ती पाडलीच पाहिजेत. हा निकाल परिपत्रक, कार्यकारी आदेश आणि ओडीपीवर आधारित झोनिंग प्रमाणपत्रे अवैध ठरवतो.

पर्यावरण कार्यकर्ते स्वप्नेश शेर्लेकर यांनीही न्यायालयाच्या भूमिकेचे समर्थन करत सरकारच्या धोरणांवर ताशेरे ओढले. सरकारची कृती ही असंवैधानिक व अप्रामाणिक असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. सार्वजनिक हिताचे कारण पुढे करत बेकायदेशीर गोष्टींना समर्थन मिळणार नाही हे न्यायालयाने दाखवून दिले आहे, असे ते म्हणाले. त्यांनी संबंधित मंत्र्यांना पदावरून हटवण्याचीही मागणी केली.

दरम्यान, राज्य सरकारने या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्याचा निर्णय घेतला असून, उच्च न्यायालयाच्या निर्णयावर स्थगिती मिळवण्यासाठी तयारी सुरू केली आहे.

सध्या तरी, संबंधित पाच गावांमधील सर्व विकास प्रादेशिक योजना २०२१ च्या तरतुदींनुसारच होणे आवश्यक आहे. यामुळे गोव्यातील नियोजन प्रक्रियेतील सुसूत्रता आणि पर्यावरणीय संवेदनशीलतेला न्यायालयाकडून मोठे पाठबळ मिळाले आहे.

### निकालपत्रातले महत्वाचे मुद्दे

- कळंगुटसह पाच गावांचे ओडीपी उच्च न्यायालयाने रद्द केले
- आरपी २०२१ प्रमाणेच विकास शक्य; विरोधी परवाने, परिपत्रके रद्द
- झोनिंग प्रमाणपत्रे, बांधकाम परवाने बेकायदेशीर
- सरकारच्या निर्णयांवर गंभीर टीका; पर्यावरण कार्यकर्त्यांची मागणी: जबाबदार मंत्र्यांना हटवा
- सर्वोच्च न्यायालयात सरकारकडून अपील दाखल होण्याची शक्यता

# 'माझी बस योजना'वर खासगी बस मालक संघटना नाराज

## प्रलंबित देयके आणि अस्पष्ट अटींवर सवाल



■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** मुख्यमंत्र्यांनी नुकतेच जाहीर केलेल्या 'माझी बस योजना २०२५' संदर्भात सरकारच्या घोषणांवर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित करत, ऑल गोवा बस ओनर्स असोसिएशनचे सचिव सुदीप ताम्हणकर यांनी बैठक घेतली . बैठकीत खाजगी व कदंबा बससेवेतील महिलांसाठी ५०% भाडे सवलत, तिकीट मशीन सक्ती आणि अन्य उपाययोजनांबाबत कोणतीही सल्लामसलत सरकारने न केल्याचा आरोप त्यांनी केला.

ताम्हणकर म्हणाले, या योजनेत समाविष्ट होण्याआधी २०१८–१९ मधील प्रलंबित अनुदान देयके आमच्या खात्यावर जमा होणे गरजेचे आहे. सरकारने फक्त ९ महिन्यांचे अनुदान एकत्र देण्याचा प्रस्ताव दिला आहे, परंतु आम्हाला संपूर्ण थकबाकी आगाऊ हवी आहे. या आर्थिक प्रश्नांची उकल होईपर्यंत कोणताही बस मालक या योजनेत सहभागी होणार नाही.

संघटनेच्या सदस्यांनी 'माझी बस योजना'तील अटी व नियमांचे बारकाईने परीक्षण केल्याचे ताम्हणकर यांनी सांगितले. संपूर्ण स्पष्टता येईपर्यंत आम्ही कोणताही निर्णय घेणार नाही. मुख्यमंत्री आणि परिवहन मंत्र्यांशी आमचा नियमित संपर्क सुरू आहे, मात्र सध्या कोणताही ठोस मार्ग ठरलेला नाही, असे ते म्हणाले.

कदंबा परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांची दुरवस्था देखील बैठकीत चर्चेचा विषय ठरली. ताम्हणकर म्हणाले, पावसाळ्यात गळती, खिडक्यांचे तुटणे, स्वच्छतेचा अभाव – कदंबा बसस्थानकांची अवस्था अत्यंत खराब आहे. ही बसस्थानके वाहतूक विभागाच्या मालकीची असून ती कदंबाला भाडेपट्ट्यावर दिली आहेत, मात्र देखभालीची कोणतीही जबाबदारी पार पाडली जात नाही.

त्यांनी सरकारला आवाहन केले की, खाजगी संघटनांना बसस्थानकांची देखरेख करण्याची संधी दिली जावी, जेणेकरून प्रवाशांना योग्य सुविधा मिळतील आणि पर्यटकांवर चांगला प्रभाव पडेल.

१९९८ मध्ये तीन प्रमुख मार्गांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर, १२२ खाजगी बसेस हटवण्यात आल्या आणि आता केवळ ७०–८० कदंबा बसेस या मार्गांवर धावत आहेत, असे ताम्हणकर म्हणाले. पणजी–वास्को, पणजी–मडगाव आणि मडगाव–वास्को या मार्गांवरील प्रवाशांना अजूनही गैरसोयींचा सामना करावा लागतो. कदंबा ना दर्जेदार सेवा देतो, ना नफा मिळवतो. हे मार्ग पुन्हा खासगी ऑपरेटरसाठी खुले करावेत, ही आमची सातत्याने मांडलेली मागणी आहे.

ताम्हणकर यांनी मुख्यमंत्र्यांना वेळोवेळी लेखी निवेदने दिली असूनही फारसा प्रतिसाद न मिळाल्याचा आरोप केला. सरकार खरे भागधारक न विचारता योजनांची घोषणा करत राहते.सांगे मधील एका कार्यक्रमात केंद्रीय मंत्र्यांची उपस्थिती होती, पण जर निधीच उपलब्ध नसेल तर अशी पत्रे वाटण्याचा काय अर्थ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

ताम्हणकर यांनी शेवटी स्पष्ट केले की, सरकारने ₹३०,००० पर्यंत विमा अनुदान देण्याचे किंवा नवीन बससाठी ₹१० लाखांचे अनुदान देण्याचे जे आश्वासन दिले आहे, त्यावर आम्हाला विश्वास नाही, कारण २०१८ पासूनची बाकी देयकेच त्यांनी दिलेली नाहीत. जेव्हा पूर्वीची बिलेही दिलेली नाहीत, तेव्हा नवीन योजनांवर आमचा विश्वास कसा ठेवावा?

# गोव्यात फॉर्मेलिनमुक्त मासळीची खात्री: दोन लाख नमुन्यांची तपासणी

## एकही नमुना दूषित आढळला नाही - आरोग्यमंत्र्यांचा दावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** गोव्याच्या मासळीप्रेमींसाठी एक दिलासादायक बातमी देत, आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी मंगळवारी जाहीर केले की २०१९ पासून गोव्यातील तीन मुख्य ठिकाणी २ लाखांहून अधिक माशांच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली असून,कुठल्याही नमुन्यात फॉर्मेलिनचे अंश आढळलेले नाहीत.

फेसबुक पोस्टद्वारे ही माहिती देताना राणे यांनी सांगितले की, क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया च्या सहकार्याने पोळे , पत्रादेवी आणि मडगाव येथील प्रवेश व वितरण बिंदूंवर २४७ चाचणी व्यवस्था उभारण्यात आली आहे.

एकाही नमुन्यात फॉर्मेलिन आढळले नाही, हे आमच्यासाठी आरोग्यदृष्ट्या महत्त्वाचे यश आहे, असे राणे यांनी स्पष्ट केले.

मंत्री राणे यांनी पुढे सांगितले की, गोवा अन्न व औषध प्रशासन द्वारे अत्याधुनिक इन–हाऊस प्रयोगशाळांमधून तसेच एनएबीएल मान्यताप्राप्त तृतीय पक्ष प्रयोगशाळांमधून नियमितपणे मासळीचे विश्लेषण केले जाते.

मार्च ते जून २०२५ या कालावधीत उत्तर आणि दक्षिण गोव्यातून गोळा केलेल्या नमुन्यांमध्ये फॉर्मल्डिहाइड आढळलेला नाही, असेही त्यांनी नमूद केले.



### तीन प्रमुख ठिकाणी तपासणी तपशील:

**पोळे : ३३,८०५ नमुने**
**पत्रादेवी: ३३,९८९ नमुने**
**मडगाव घाऊक बाजार: १,३२,७१७ नमुने**
**एकूण: २,००,५११ नमुन्यांची तपासणी – सर्व नकारात्मक**

गोवा अन्न व औषध प्रयोगशाळा आणि आय सी पी एम एस सारख्या आधुनिक उपकरणांनी सुसज्ज आहे. या प्रगत प्रणालीमुळे अतिसूक्ष्म दूषित रसायनांचाही अचूक शोध घेणे शक्य होत आहे. हे तंत्रज्ञान राज्यातील अन्नसुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्यासाठी आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, असे राणे म्हणाले.

हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा या उपक्रमाद्वारे फातोर्डा घाऊक मासळी बाजारात फॉर्मेलिन चाचणीच्या कमतरतेवर प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. एकेकाळी संपूर्ण राज्यभरात खळबळ उडवणाऱ्या या विषयावर पुन्हा एकदा सार्वजनिक चिंता व्यक्त केली जात होती.

मासळी गोव्यातील दैनंदिन आहाराचा महत्त्वाचा भाग असल्याने, तिच्या गुणवत्तेबाबत सरकारचा दावा नागरिकांच्या आरोग्यविश्वासासाठी महत्त्वाचा आहे. तथापि, स्थानिक पातळीवरील सतत निरीक्षण, स्वतंत्र तपासणी आणि सार्वजनिक पारदर्शकता* यावरही नागरिकांचा भर असल्याचे विविध प्रतिक्रियांमधून जाणवते.

# ज्येष्ठ नागरिकांसमोर आर्थिक, सामाजिक आणि कायदेशीर आव्हाने

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** दक्षिण गोव्यातील निवांत गावे आणि निवृत्तीनंतरचा शांत जीवनमानाचा साक्षात्कार असंवेदनशील वास्तवाने झाकोळला जात आहे. सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांनंतरही अनेक ज्येष्ठ नागरिक आर्थिक असुरक्षितता, अपुरी आरोग्यसेवा, सामाजिक एकाकीपणा आणि अगदी छळाचा सामना करत आहेत.

स्थानिक ज्येष्ठ नागरिक लक्ष्मण नाईक म्हणाले, स्मृतिभ्रंशासारख्या स्थितींसाठी फारसे आधार नाही. नोकरशाहीतील अडथळे आणि पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे वृद्धांची काळजी घेणे अवघड होते. त्यांनी अधिकाऱ्यांना वृद्ध कल्याणासाठी अधिक लक्ष्यित हस्तक्षेप आणि नियमित आरोग्य तपासणी करण्याचे आवाहन केले.

वृद्ध नागरिक एम. ए. रायकर म्हणाले, दक्षिण गोव्यातील गावे निवृत्तीसाठी आदर्श असली तरी वास्तवात अनेकांसाठी ही जागा सुरक्षित नाही. आर्थिक, सामाजिक आणि भावनिक आव्हाने सतत भेडसावत असून, यांचा थेट परिणाम जीवनाच्या गुणवत्तेवर होतो. याकडे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे.

२४ जून २०२५ पर्यंत दक्षिण गोव्यातील पोलिस ठाण्यांमध्ये १,५७७ ज्येष्ठ नागरिकांची नोंदणी झाली आहे. पोलिस विभागाने भाडेकरू, स्थलांतरित कामगार आणि वृद्ध नागरिकांचा डेटा अद्ययावत ठेवण्याचे काम सुरू ठेवले आहे.



सांगे पोलिस ठाण्याचे निरीक्षक दितेंद्र नाईक यांनी सांगितले की, बीट स्टाफ नियुक्त करण्यात आले असून, ते नोंदणीकृत वृद्धांची नियमितपणे भेट घेतात. आम्ही प्रत्येक वृद्ध नागरिकाला नियंत्रण कक्ष व पोलिस ठाण्याचे आपत्कालीन संपर्क क्रमांक पुरवतो. तक्रारी आल्या तर तत्काळ प्रतिसाद दिला जातो, असे नाईक म्हणाले.

त्यांनी सांगितले की, वृद्धांना घरगुती मदतनीस पडताळणी,लॉकरचा वापर, आणि मूलभूत सुरक्षा साधनं याबाबत सल्ला दिला जातो. तसेच हक्क जागरूकता मोहिमाही राबवल्या जात आहेत.

जी.आर. करे लॉ कॉलेजच्या कार्यकारी प्राचार्या डॉ. मारिया गोरेट्टी सिमोस ई मोरैस यांनी २०१९ मध्ये स्थापन झालेल्या ज्येष्ठ नागरिक कायदेविषयक सहाय्यता केंद्राचे महत्त्व अधोरेखित केले. हे केंद्र मोफत कायदेशीर सल्ला देते आणि वृद्धांना कायदेशीर मंचांवर आपली बाजू मांडण्यासाठी मदत करते, असे त्या म्हणाल्या.

महाविद्यालय ऑल गोवा सिनिअर सिटिझन्स फोरम यांच्यासह जागरूकता उपक्रम आणि ज्येष्ठ अत्याचार जागरूकता दिनही साजरे करते.

दक्षिण गोवा ॲडव्होकेट्स असोसिएशनचे अध्यक्ष ॲडव्होकेट प्रसाद नाईक यांनी सांगितले की, पालक आणि ज्येष्ठ नागरिकांचे देखभाल व कल्याण कायदा, २००७ आणि त्यासोबतचे गोवा नियम, २००९ हे वृद्धांच्या सन्मानपूर्वक जगण्याची कायदेशीर चौकट देतात. या कायद्यानुसार, मुले आणि नातेवाईक वृद्धांचे पालनपोषण करण्यास कायदेशीररित्या बांधील आहेत.

नाईक यांनी पुढे स्पष्ट केले की, मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने अलीकडेच दिलेल्या निकालात म्हटले आहे की, वृद्ध नागरिकांचे संरक्षण न्यायाधिकरणांपुढील प्रलंबित प्रकरणांमध्ये कोणत्याही पक्षाचे वकील न्यायाधिकरणासमोर हजर राहून बाजू मांडू शकतात.

प्रशासकीय यंत्रणा, पोलिस, कायदेशीर संस्था आणि स्वयंसेवी संघटना यांच्या संयुक्त प्रयत्नांशिवाय वृद्धांच्या वास्तवात फारसा फरक पडणार नाही, असा समारोप अनेक कार्यकर्ते करत आहेत. योजना अस्तित्वात असल्या तरी त्यांची पोहोच, प्रभावी अंमलबजावणी आणि संवेदनशील दृष्टिकोन ही अजूनही मोठी आव्हाने आहेत.

# कुडचडे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पर्यावरणीय मंजुरीशिवाय

■ टीम दैनिक हेराल्ड

## आरटीआय द्वारे खुलासा, कार्यकर्त्यांची चौकशीची मागणी



**कुडचडे, दि. २ :** कुडचडे मधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या (एसटीपी ) बांधकामासंदर्भात गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या माहितीने गंभीर पर्यावरणीय नियमभंग समोर आणला आहे. स्थानिक रहिवासी सुशांत वस्त यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंडळाने स्पष्ट केले की, सदर प्रकल्पासाठी कोणतेही पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन करण्यात आलेले नाही.

कूडचडे औद्योगिक वसाहतीजवळील सर्वेक्षण क्र. ५०५ वर विकसित होणाऱ्या या प्रकल्पासाठी नगर आणि देश नियोजन विभाग तसेच कुडचडे –काकोडा नगरपालिका परिषदेकडून ना हरकत प्रमाणपत्रे जारी करण्यात आली होती. मात्र, पर्यावरणीय अभ्यास किंवा जनसल्लामसलतीशिवाय या परवानग्या देण्यात आल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाने मान्य केले आहे.

पर्यावरण कार्यकर्त्यांच्या मते, हे ईआयए अधिसूचना २००६ तसेच राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या २०१३ च्या आदेश यांचे स्पष्ट उल्लंघन आहे. एनजीटीच्या निर्णयानुसार कोणत्याही सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी – विशेषत: औद्योगिक कचऱ्याचा समावेश असलेल्या; पर्यावरणीय मंजुरी घेणे बंधनकारक आहे.

पर्यावरण कार्यकर्ते आदित्य देसाई यांनी सांगितले की, सदर एसटीपीची सांडपाणी वाहिनी काकोडा औद्योगिक वसाहतीमधून येते. त्यामुळे या सांडपाण्यात औद्योगिक घटकांचा समावेश होतो, जे प्रकल्पाला 'कंपोजिट इफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट म्हणून पात्र ठरवते. परिणामी, त्यासाठी ईआयए आणि पर्यावरणीय मंजुरी आवश्यक ठरते.

देसाई यांच्या म्हणण्यानुसार, एसटीपीचे बांधकाम झुआरी नदीच्या सान्निध्यात होत असून, नदीपात्रात बेकायदेशीर भराव घालण्यात आला आहे. यासोबतच खारफुटी नष्ट केल्याचेही त्यांनी आरोप केले आहेत. हा प्रकार जल (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम २४(१)(ब) चा उल्लंघन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आरटीआय उत्तरामध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, जी पी सीबी कडे बेसलाइन पाण्याच्या गुणवत्तेचा अहवाल, जनतेच्या सल्लामसलतीसंबंधी रेकॉर्ड, तसेच संभाव्य पर्यावरणीय परिणामांचा दस्तऐवज उपलब्ध नाही. यामुळे संपूर्ण मंजुरी प्रक्रिया पारदर्शकतेअभावी केली गेल्याचा संशय बळावतो.

देसाई यांनी राजस्थान उच्च न्यायालयाच्या २४ ऑक्टोबर २०२४ च्या निर्णयाचा संदर्भ दिला, ज्यात जलाशय किनारी, पूर क्षेत्रे व पाणलोट क्षेत्रांमध्ये कोणत्याही अनधिकृत बांधकामावर बंदी घालण्यात आली आहे. यामध्ये सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना आणि जलशक्ती मंत्रालयाला कठोर अंमलबजावणीचे निर्देश देण्यात आले होते.

या सर्व खुलास्यांमुळे कुडचडे एसटीपी संदर्भात पर्यावरणीय उत्तरदायित्वाकडे सरकार व स्थानिक प्रशासनाने दुर्लक्ष केले असल्याचे स्पष्ट होत आहे. आता पर्यावरण कार्यकर्त्यांकडून या प्रकल्पाच्या चौकशीची आणि बांधकाम थांबवण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# सीसीपी प्रभाग सीमांकनावरील याचिका फेटाळली

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने पणजी महानगरपालिका प्रभाग सीमांकनाचे अधिकार महानगरपालिका प्रशासन संचालकांना देण्याच्या निर्णयाला सोमवारी वैध ठरवत यास विरोध करणारी याचिका फेटाळून लावली.

ही याचिका माजी नगरसेवक मेनिनो दा क्रूझ यांनी दाखल केली होती. त्यांनी यामध्ये पणजी महानगरपालिका कायदा, २००२ मधील फेब्रुवारी २००५ च्या दुरुस्तीला आव्हान दिले होते, कारण त्यानुसार महानगरपालिका प्रशासन संचालकांना प्रभागांची रचना आणि फेरबदल करण्याचे अधिकार मिळाले आहेत.

ही दुरुस्ती राजकीय पक्षांच्या फायद्यासाठी सीमांकनात फेरफार करू शकते, आणि त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार कमजोर होतात, असा युक्तिवाद याचिकाकर्त्याने केला होता. तसेच, प्रभाग रचना ही राज्य निवडणूक आयोगाकडेच असावी, म्हणजेच निवडणूक प्रक्रियेत **पारदर्शकता, तटस्थता आणि स्वातंत्र्य अबाधित राहील, असा दावा याचिकेद्वारे करण्यात आला होता.

राज्य सरकारने न्यायालयात स्पष्ट केले की, प्रभाग रचना आणि पुनर्रचना ही राज्य निवडणूक आयोगाच्या एकाधिकारातील बाब नाही.कायद्याच्या चौकटीत इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही हे अधिकार सोपवता येतात, असा युक्तिवाद केला गेला.

न्यायालयानेही राज्य सरकारच्या बाजूने निर्णय दिला आणि सांगितले की यामध्येराज्य निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य बाधित होत नाही. परिणामी, याचिका फेटाळण्यात आली.

हा निर्णय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात आणि निवडणूक व्यवस्थापनात राज्य सरकारला कार्यक्षमतेने अधिकार बहाल करण्याच्या भूमिकेला पाठबळ देणारा ठरतो. या प्रकरणाचा निकाल आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरणार आहे, जिथे प्रभागांचे नवीन सीमांकन ही राजकीय आणि प्रशासकीयदृष्ट्या संवेदनशील बाब ठरू शकते.